# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## अधिसभेच्या १० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## रविवार, दि.२९ मार्च, २०१५ दुपारी १२:०० वा.

अधिसभेची १० वी बैठक दि.२९ मार्च, २०१५ रोजी दुपारी १२:०० वा. विद्यापीठ सभागृहात मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन.- कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. - संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ३) | प्राचार्य डॉ. शेख जी. ए. | सदस्य |
| ४) | प्राचार्य डॉ. देशमुख ए. एल. | सदस्य |
| ५) | प्राचार्य डॉ. चौधरी बी. व्ही. | सदस्य |
| ६) | प्राचार्य डॉ. हलकुडे एस. ए. | सदस्य |
| ७) | प्राचार्य डॉ. कोळेकर सी. बी. | सदस्य |
| ८) | प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. | सदस्य |
| ९) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| १०) | प्राचार्य श्री. धुत्तरगाव एस. सी. | सदस्य |
| ११) | प्राचार्य श्री. राजमाने एन. आर. | सदस्य |
| १२) | प्राचार्य डॉ. जुंदळे एस. बी. | सदस्य |
| १३) | प्राचार्य डॉ. फरताडे एम. एम. | सदस्य |
| १४) | प्राचार्य डॉ. श्रीमती वडवान एम. ए. | सदस्या |
| १५) | श्री. डोंगरे एम. एस. | सदस्य |
| १६) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| १७) | डॉ. रोंगे बी. पी. | सदस्य |
| १८) | डॉ. अवताडे एच. के. | सदस्य |
| १९) | डॉ. कदम आर. डी. | सदस्य |
| २०) | डॉ. कोळेकर टी. एन. | सदस्य |
| २१) | डॉ. चव्हाण सी. एस. | सदस्य |
| २२) | डॉ. भोसले यु. व्ही. | सदस्य |
| २३) | डॉ. बाड डी. आर. | सदस्य |
| २४) | डॉ. बचुटे एम. टी. | सदस्य |
| २५) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| २६) | डॉ. बारबोले ए. एन. | सदस्य |
| २७) | डॉ. भिलेगावकर एस. डी. | सदस्य |
| २८) | डॉ. श्रीमती दळवी आर. जे. | सदस्या |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| २९) | डॉ. काशीद एस. एस. | सदस्य |
| ३०) | डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. | सदस्या |
| ३१) | डॉ. श्रीमती रेवडकर बी. डी. | सदस्या |
| ३२) | डॉ. शिंदे एस. व्ही. | सदस्य |
| ३३) | श्री. गायकवाड आर. एस. | सदस्य |
| ३४) | श्री. गायकवाड एस. पी. | सदस्य |
| ३५) | श्री. शिंदे आर. बी. | सदस्य |
| ३६) | श्री. कोकरे एम. बी. | सदस्य |
| ३७) | श्रीमती विभुते एस. बी. | सदस्या |
| ३८) | श्री. चौगुले एस. एस. | सदस्य |
| ३९) | श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| ४०) | प्राचार्य श्री. जमादार के. एम. | सदस्य |
| ४१) | डॉ. वडगावकर पी. पी. | सदस्य |
| ४२) | श्री. रुपनर बी. ए. | सदस्य |
| ४३) | श्री. वाघमोडे एस. एम. | सदस्य |
| ४४) | श्री. रिसबूड एस. एच. | सदस्य |
| ४५) | डॉ. भोसले आर. बी. | सदस्य |
| ४६) | डॉ. घुटे व्ही. बी. | सदस्य |
| ४७) | डॉ. पवार एन. बी. | सदस्य |
| ४८) | डॉ. निंबाळकर व्ही. एच. | सदस्य |
| ४९) | डॉ. कदम डी. जी. | सदस्य |
| ५०) | डॉ. एम. कृष्णमूर्ती | सदस्य |
| ५१) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| ५२) | डॉ. श्रीमती रंगरेज ए. एम. | सदस्या |
| ५३) | श्री. कदम एल. एस. | सदस्य |
| ५४) | श्री. कांबळे एन. आर. | सदस्य |
| ५५) | श्री. घागरे एम. व्ही. | सदस्य |
| ५६) | डॉ. सूर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ५७) | डॉ. गवळी आर. एस. | सदस्य |
| ५८) | श्री. मंथा एस. एन. | सदस्य |
| ५९) | श्री. पाटील बी. पी., परीक्षा नियंत्रक | निमंत्रित |
| ६०) | श्री. अनपट एस. बी., प्रभारी वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित |
| ६१) | श्री. माळी एस. के. | सचिव |

स्वागत:

मा.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष आणि अधिसभेचे सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती :**

डॉ. अशोककुमार ई. एन. व श्री. गांधी आर. एच. यांनी पत्राद्वारे, प्राचार्य डॉ.चिट्टे जी. एन., प्राचार्य डॉ. शिंदे डी. के., सौ. मोहिते-पाटील पी. पी., आमदार श्री. दिपकराव साळुखे-पाटील, यांनी दूरध्वनीद्वारे अधिसभेच्या या बैठकीस अनुपस्थिती कळविली. त्यानुसार त्यांच्या अनुपस्थितीस मान्यता देण्यात आली. याशिवाय अधिसभेच्या या बैठकीस विभागीय सहसंचालिका (उच्च शिक्षण) सोलापूर विभाग, मा. प्र. सहसंचालक (तंत्र शिक्षण), मा. संचालक (DMER), श्री. नलवडे पी. आर. संचालक विद्यार्थी कल्याण मंडळ, प्राचार्य डॉ. शेंडगे आर. एन., श्री. सपाटे एम. जी., कु. सायली वनारसे अध्यक्ष, विद्यार्थी विद्यापीठ परिषद, श्री. ओंकार वायचळ सचिव, विद्यार्थी विद्यापीठ परिषद, डॉ. गायकवाड एस. पी., डॉ. गेंगजे एस. आर., श्री. पाटील सी. बी., श्री. देशपांडे ए. व्ही., श्री. व्हनकळस डी. डी., श्रीमती जमादार एम. पी., श्री. शेळके बी. बी., श्रीमती पाटील एस. एन., हे अधिसभा सदस्य अधिसभेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

कुलसचिवांनी परिनियम ४७४ (१) नुसार, मा.कुलगुरुंना नवव्या अधिसभेच्या बैठकीपासून या बैठकीदरम्यानच्या कालावधीतील विद्यापीठातील घडामोडीचा आणि प्रगतीचा अहवाल सादर करण्याबाबत विनंती केली व त्याप्रमाणे मा. कुलगुरुंनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केला.

**"अ" जनरल आणि कुलसचिव कार्यालय**

०१. शैक्षणिक वर्ष २०१२.२०१३ चा "९ वा वार्षिक (मराठी व इंग्रजी) अहवाल" तयार करण्यात आला.

०२. विविध अभ्यासमंडळाअंतर्गत येणाऱ्या विषयांचे अभ्यासक्रम तयार करण्यासाठी नेमलेल्या उपसमितीच्या बैठका संपन्न झाल्या.

०३. शासन परिपत्रकानुसार "स्वच्छ भारत अभियान" या मोहिमे अंतर्गत परिपत्रकानुसार व शपथ पत्रिकेमध्ये निर्देशित केल्याप्रमाणे वर्षातून १०० तास म्हणजे आठवडयातून २ तास श्रमदान करण्याकरीता प्रस्तुत विद्यापीठातील सर्व शिक्षक व प्रशासकीय सेवकांकडून श्रमदान करुन स्वच्छतेची संकल्पना पूर्ण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

०४. १२ व्या पंचवार्षिक योजने अंतर्गत मुलींचे (अंदाजे १९०७.०७ चौ.मी.) (Women Hostel) वसतीगृह इमारत बांधणे या कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम रु.६,१५,५०,०००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव यु.जी.सी., नवी दिल्ली येथे सादर केला आहे.

०५. निवडणुक प्रक्रिया सर्व विद्यापीठातून व्यवस्थित राबविली जावी याकरीता दिनांक ०२ डिसेंबर, २०१४ रोजी सर्व अकृषी विद्यापीठातील कुलसचिवांची एक दिवसीय कार्यशाळा सोलापूर विद्यापीठात आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेचे प्रमुख पाहुणे म्हणून महामहिम राज्यपालांचे सचिव श्री. विकासचंद्र रस्तोगी, माजी कुलगुरु डॉ. येडेकर, डॉ. के. एम.

कुलकर्णी व महाराष्ट्रातील जवळपास आठ विद्यापीठांचे कुलसचिव, उपकुलसचिव, सहा.कुलसचिव तसेच निवडणुकीचे काम पाहणारे अधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते. त्यावेळी परीक्षा विभागातील नवीन कार्यप्रणाली पाहून महामहिम राज्यपालांचे सचिव, श्री. विकासचंद्र रस्तोगी यांनी याबाबत समाधान व्यक्त करुन विद्यापीठाचे कौतुक केले.

०६. विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली येथे दि. २६.११.२०१४ रोजी आयोजित केलेल्या अकराव्या पंचवार्षिक योजनेसंदर्भात इंटरफेस बैठकीकरीता कुलसचिव श्री. एस. के. माळी व लेखापाल श्री. खपाले यांनी युजीसी कार्यालय, नवी दिल्ली येथे सहभाग नोंदविला.

०७. दिनांक २७.११.२०१४ रोजी मुंबई विद्यापीठ येथे आयोजित केलेल्या 'मुनीजन' या कार्यक्रमाचे उद्धाटन मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, मा. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री श्री विनोद तावडे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. सोलापूर विद्यापीठाच्या वतीने मा. कुलगुरु डॉ. एन. एन. मालदार यांनी सहभाग नोंदविला.

०८. रविवार दि. ३०.११.२०१४ रोजी सोलापूर विद्यापीठात सर्व शिक्षक व कार्यालयीन कर्मचारी यांच्याकरीता 'गुगल ॲप फॉर एज्युकेशन' यावर दोन सत्री प्रशिक्षण शिबीर संपन्न झाले. यावेळी श्री. विकास धवन मुख्यकार्यकारी अधिकारी, सीअर्स, श्री. निखिल, श्रीमती नेहा वाजपेयी, डॉ. हेगडी यांनी मार्गदर्शन केले.

०९. मे. विशाल एक्सपर्ट प्रा. लि. शिवाजी नगर, पुणे यांना प्रस्तुत विद्यापीठात, दिनांक ०१ जानेवारी, २०१५ पासून कंत्राटी पध्दतीने अकरा महिन्याकरीता मनुष्यबळ पुरविण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत.

१०. राज्य शासनाच्या निर्देशानुसार दरवर्षी प्रमाणे सन २०१४-१५ मधील महाविद्यालये व विद्यापीठांची माहिती व्यवस्थापन प्रणालीत अद्यावत करणे अनिवार्य आहे. त्या अनुषंगाने सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व माहिती व्यवस्थापकीय प्रणालीत अपलोड वेळेत करुन सोलापूर विद्यापीठाने प्रथम क्रमांक पटकाविला. याची शासनाने यथोचित नोंद घेऊन संबधित अधिकाऱ्यांना प्रशस्तीपत्र बहाल केले.

११. सोलापूर विद्यापीठातील विविध बांधकामासंदर्भात वास्तु विशारद फी पोटी ऑर्कीटेक्चर यादगिरी कोंडा यांचे प्रलंबित असलेले न्यायालयीन प्रकरण तडजोडी कमिटी नेमून सदरचे प्रलंबित प्रकरण दिनांक १३.१२.२०१४ रोजी लोकअदालत न्यायालयात निकाली काढण्यात आले.

१२. दिनांक ०३ ते ०७ जानेवारी, २०१५ या कालावधीकरीता मुंबई विद्यापीठ येथे १०२ वी "इंडियन सायन्स कॉग्रेस" चे आयोजन करण्यात आले. मा. कुलगुरु डॉ. एन. एन. मालदार यांनी दिनांक ०३ व ०४ या दोन दिवस सदर कार्यक्रमात सोलापूर विद्यापीठाच्यावतीने सहभाग नोंदविला.

१३. २६ जानेवारी, २०१५ रोजी भारतीय गणतंत्रदिनानिमित्त विद्यापीठामध्ये मा. कुलगुरु यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला. सदर कार्यक्रमास विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेत्तर सेवक तसेच विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

१४. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व डॉ. अनंत ॲण्ड लता लाभसेटवार चॅरिटेबल ट्रस्ट, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानमालेत दिनांक ०२ फेब्रुवारी, २०१५ रोजी मा. डॉ. आ. ह. साळुंखे, सातारा यांचे "समतेच्या **प्रयत्नांचा इतिहास"** या विषयावर व्याख्यान संपन्न झाले.

१५. प्रस्तुत विद्यापीठाकडील वित्त व लेखाधिकारी या संवैधानिक पदाची जाहिरात दिनांक २३.०२.२०१४ रोजीच्या दैनिक सकाळ, एक्सप्रेस करिअर वेस्ट पॅकेज, महाराष्ट्र शासनाच्या व विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

१६. दिनांक १६.०२.२०१५ रोजी श्रीमती राजश्री साकळे, कोल्हापूर यांचे "कामाच्याठीकाणी महिलांवर होणारा लैंगिक छळ कायदा-२०१३" या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. सदर व्याख्यानास विद्यापीठातील शिक्षक, विद्यार्थी व विद्यार्थींनी बहुसंख्येने उपस्थित होते.

१७. निवड आधिरित श्रेयांक प्रणाली (Choice Based Credit System) च्या अंमलबजावणी संदर्भात सर्व संकुलाचे संचालक, सर्व अधिविभाग प्रमुख व विद्यापीठ अधिकारी यांची दिनांक १८.०२.२०१५ रोजी मा. कुलगुरु महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. तसेच मा. कुलगुरु महोदयांनी दि. २३.०२.२०१५ रोजी मा. ना. विनोद तावडे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे संपन्न झालेल्या बैठकीस उपस्थिती नोंदवून सोलापूर विद्यापीठाचे विचार मांडले.

१८. दि. २४.०२.२०१५ रोजी सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे JBVC ची बैठक मा. कुलपती तथा राज्यपाल यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदर बैठकीस सोलापूर विद्यापीठाचे मा. कुलगुरु उपस्थित राहिले.

१९. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये विद्यापीठातील अधिविभागाकडे प्रवेशीत एकूण ४१७ मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती व फ्रीशिप करीता ऑनलाईन अर्ज भरलेले आहेत.

**"ब" विद्यापीठ व महाविद्यालय विकास मंडळ**

०१. कला व ललीत कला, वाणिज्य, शिक्षणशास्त्र, विज्ञान, सामाजिकशास्त्रे व अभियांत्रिकी-फॉर्मासी या विद्याशाखांची विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळ बैठका दिनांक १-५ नोव्हेंबर, २०१४ या कालावधीत संपन्न झाल्या.

०२. विशेष कक्ष विभागाकडे प्राध्यापक पदासाठी आज अखेर एकूण ९०० इतक्या मागासवर्गीय उमेदवारांनी नांव नोंदणी केली आहे.

०३. संलग्नित महाविद्यालयातील सहयोगी प्राध्यापकांतून प्राध्यापक संवर्गात पदोन्नतीसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांचे मूल्यांकन करण्याकामी समिती गठीत API चे मूल्यांकन करणेबाबत प्रस्तावातील १९ अध्यापकांना मूल्यांकनाचे प्रमाणपत्र दिले आहे. संलग्नित महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या सहयोगी प्राध्यापक संवर्गातून प्राध्यापक संवर्गात पदोन्नतीसाठी विद्यापीठ विहित निवड समिती अहवालावर योग्य ती कार्यवाही करुन संबधित महाविद्यालयातील एकूण सात अध्यापकांना प्राध्यापक पदी पदोन्नतीस मान्यता देण्यात आली.

०४. विजयसिंह मोहिते-पाटील महाविद्यालय, नातेपूते, ता. माळशिरस या महाविद्यालयास दि. १४.१०.२०१४ रोजी विद्यापीठ अनुदान आयोग कायदा, १९५६ कलम १२(B) मिळाले असल्याने सदर महाविद्यालयाचे चार प्रस्ताव (Development Assistant to College, IQAC, Establishment of UGC Network Resource Centre, Development of Sports Infrastructure & Equipment in Colleges) विद्यापीठ अनुदान आयोग, पश्चिम विभागीय कार्यालय, पुणे या कार्यालयास पाठविण्यात आले आहेत.

०५. डी.बी.एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्‌स ॲन्ड सायन्स, सोलापूर यांचे CPE under XII Plan या प्रस्तावास विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली या कार्यालयाकडून मंजूरी प्राप्त झाली आहे.

०६. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाचा दिर्घकालीन बृहत आराखडा तयार करण्याबाबतची कार्यवाही तज्ञ उपसमिती मार्फत दिनांक ०७.११.२०१४ रोजी पूर्ण करण्यात आली.

०७. सोलापूर विद्यापीठात राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट) केंद्रास विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी), नवी दिल्ली यांच्या शिफारसीने सी.बी.एस.ई. यांच्याकडून पत्र क्र. नेट २०१४ दि. १३.१०.२०१४ न्वये मान्यता मिळाली आहे. नेट परीक्षा अर्ज स्वीकृतीचे केंद्र विद्यापीठात सुरु करण्यात आले आहे. यामुळे परीक्षार्थींची उत्तम सोय झाली आहे. प्रा. पी. प्रभाकर समन्वयक म्हणून काम पाहत आहेत. नेट परीक्षा दिनांक २६ डिसेंबर, २०१४ रोजी यशस्वीरीत्या पार पाडण्यात आली. सदर परीक्षेकरीता सोलापूर जिल्ह्यातुन तसेच लातूर, उस्मानाबाद, नांदेड, विजापूर, बागलकोट, बीदर या भागातून एकूण २९५८ इतके अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी एकूण २४९६ इतक्या विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

०८. सर्व संलग्नित महाविद्यालयांकडून सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षासाठी ताण-तणाव नियोजन अनुदान मागणीचे प्राप्त प्रस्तावांची मा. कुलगुरु महोदयांनी गठीत केलेल्या समिती अन्वये छाननी / पडताळणी होऊन, पात्र १८ महाविद्यालयांना अनुदान मंजूरीचे पत्र महाविद्यालयांना पाठविण्यात आले आहे.

०९. सुकाणू समिती व क्रायटेरिया निहाय समितीचे अध्यक्ष यांनी वारंवार बैठका घेऊन सोलापूर विद्यापीठाचा स्वयं अभ्यास अहवालाचा संभ्याव्य मसुदा नॅक विभागाकडे सादर केला. त्याच प्रमाणे सर्व संकुल व विभागनिहाय मुल्यांकन अहवाल संबंधित संचालक व विभाग प्रमुख यांच्याकडून प्राप्त झाला. अशाप्रकारे तयार झालेल्या एकत्रित अहवालाचे परिपूर्ण निकषनिहाय पडताळणी-पाहणी करुन सोलापूर विद्यापीठाचा एस. एस. आर. व सहपत्रे दि. १६.११.२०१४ रोजी नॅक कार्यालयाच्या सुचनेनुसार सोलापूर विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध केला आहे. या अनुषंगाने नॅक तज्ञ समिती सोलापूर विद्यापीठास माहे जुलै/ऑगस्ट, २०१५ मध्ये भेट देण्याची शक्यता आहे.

१०. सोलापूर विद्यापीठाचा स्वयंमुल्यांकन अहवाल (Soft Copy) दि. १६.११.२०१४ रोजी नॅक कार्यालयास व विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन सादर करण्यात आला होता. तदनंतर नियमानुसार नॅक कार्यालयाने कळविलेल्या सुचना विचारात घेऊन सोलापूर विद्यापीठाने सदर

स्वयंमुल्यांकन अहवाल दहा प्रतित व दहा सीडी सह नॅक कार्यालय, बेंगलोर यांना दि.०९.१२.२०१४ रोजी पोस्टाद्वारे सादर केला आहे.

११. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून नवीन महाविद्यालये, विषय / अभ्यासक्रम, अतिरिक्त तुकडी व विद्याशाखा सुरु करण्याकरीता प्राप्त प्रस्तावांची छाननी समितीची त्रुटीपूर्ततेनंतरची बैठक दिनांक २३ व २४ डिसेंबर, २०१४ रोजी संपन्न झाली.

१२. विशेष कक्षाकडे अहवाल कालावधीत सहाय्यक प्राध्यापक पदासाठी एकूण ४५ मागासवर्गीय उमेदवारांनी नांव नोंदणी केलेली आहे.

१३. महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनानुसार जे उमेदवार नेट / सेट व पी.एच.डी. उत्तीर्ण आहेत परंतु बेरोजगार किंवा महाविद्यालयाच्या सेवेत नाहीत अशा उमेदवारांची माहिती उपलब्ध करुन घेणेसाठी स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द केलेली असून सदर जाहिरातीस अनुसरुन विविध विषयांतर्गत सहाय्यक प्राध्यापकपदी नांव नोंदणीसाठी ३२ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झालेले आहेत.

१४. संलग्नित अनुदानित महाविद्यालयातील रिक्त प्राचार्यपदी प्रभारी प्राचार्य म्हणून एकूण चार प्राचार्यांना मान्यता देण्यात आली.

१५. जनविकास केंद्रांतर्गत पूर्वी एकूण २७ अभ्यासक्रम सुरु होते. सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात नव्याने एकूण ०५ अभ्यासक्रम वाढले असून आता एकूण ३२ अभ्यासक्रम सुरु आहेत.

१६. मा. महामहिम राज्यपाल महोदय यांच्या कार्यालयाकडून अविष्कार संशोधन महोत्सवाचे प्रतिवर्षी आयोजन केले जाते. राज्यस्तरीय अविष्कार महोत्सवाचा संघ निवडीसाठी विद्यापीठस्तरीय अविष्कार महोत्सव-२०१४ फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड रिसर्च, सांगोला येथे दिनांक २५ व २६ डिसेंबर, २०१४ रोजी संपन्न झाला. सदर कार्यक्रमात संगणकशास्त्र संकुलातील एक शिक्षक व एकूण आठ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला.

१७. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील याचिका क्रं. १०७५९/२०१३ दि. १३.१०.२०१४ रोजीच्या निर्णयाच्या आधीन राहून सोलापूर विद्यापीठ, सोलापूर संलग्नित विज्ञान महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयातील १४ शिक्षकांचे वरिष्ठश्रेणी व निवड श्रेणीत केंद्रीय पध्दतीने स्थाननिश्चिती करणेकरीता दिनांक ०६.०२.२०१५ रोजी शिबीर संपन्न झाले.

१८. नॅक सहयोगी समिती नजीकच्या काळात प्रस्तुत विद्यापीठास भेट देणार असल्याने विद्यापीठामध्ये याकरीता Documentation Centre तयार करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

१९. अहवाल कालावधीत शिक्षक मान्यता विभागाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त झालेल्या एकूण ०७ अर्जावर कार्यवाही करुन संबधितांना माहिती देण्यात आली.

२०. अहवाल कालावधीत विज्ञान विद्याशाखेतंर्गत एक, सामाजिकशास्त्रे विद्याशाखेतंर्गत तीन, शिक्षणशास्त्र विद्याशाखेतंर्गत एक आणि कला व ललित कला विद्याशाखेतंर्गत दोन अशा एकूण सात विद्यार्थ्यांची पीएच.डी. मौखिक परीक्षा पार पडली असून सदर विद्यार्थ्यांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली.

२१. प्रस्तुत विद्यापीठात "नॅक आयक्यूएसी" विभागाकरीता विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचेकडे अनुदान प्राप्तीसाठी दिनांक १९.०९.२०१४ रोजी प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावास अनुसरुन विद्यापीठ अनुदान आयोग यांचेकडून १२ व्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत नॅक (आयक्यूएसी) सेलकरीता एकूण रुपये चार लाख पन्नास हजार इतके अनुदान मंजूर झाले.

"क" परीक्षा विभाग

०१. ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०१४ मध्ये झालेल्या बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. (बायोटेक/ इन्टरप्रिनरशिप/ ईसीएस) या परीक्षांचे बैठक क्रमांक व हॉल तिकीट परीक्षेच्या २५ दिवस अगोदर तयार करण्यात आले व ते महाविद्यालयाच्या लॉगीन मध्ये उपलब्ध करण्यात आले.

०२. सर्व परीक्षांचे हॉल तिकीट परीक्षेपूर्वी किमान १० दिवस आधी उपलब्ध करुन देण्यात आली.

०३. परीक्षांच्या प्रश्नपत्रिका किमान ६ दिवस आधी परीक्षा केंद्रावर पोहोच करण्यात आल्या.

०४. परीक्षेबाबतच्या सर्व सुचना विद्यार्थी, महाविद्यालय, प्राचार्य, परीक्षाकेंद्र व सर्व संबंधितांना तात्काळ ई-मेल आणि SMS द्वारे कळविण्यात आल्या तसेच परीक्षेबाबतच्या सर्व सूचना, परिपत्रक व वेळोवेळी निर्गमित होणारे निर्णय तात्काळ संकेत स्थळावर उपलब्ध केले गेले.

०५. एफ.ई. ते बी.ई. (इंजिनिअरिंग), एम.बी.ए., एम.सी.ए.बी., फार्मसी, एम.फार्मसी तसेच बी आर्कीटेक्ट या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षेसाठी पहिल्यादांच या विषयाच्या प्रश्नपत्रिका On Line DEPDS या कार्यप्रणालीद्वारे परीक्षाकेंद्रावर पाठविण्यात आल्या. सदर पध्दती यशस्वीरित्या कार्यरत झाली आहे. तसेच या विषयांच्या एकूण ७७१ प्रश्नपत्रिका ऑन लाईन DEPDS कार्यप्रणालीद्वारे सुमारे २९ परीक्षा केंद्रावर यशस्वीरित्या पाठविण्यात आल्या.

०६. एम. ई., बी.ई., एम.बी.ए., एम.सी.ए. या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षेसाठी पहिल्यांदाच BAR CODE OMR उत्तरपत्रिका वापरण्यात आली. तसेच एफ.ई. ते बी.ई. या अभ्यासक्रमाच्या अंदाजे एक लाख उत्तरपत्रिकांचे मशिन स्कॅनिंग करुन आपोआप कोडींग नंबर प्रिंट करण्याचे काम पूर्ण करण्यात आले.

०७. एफ.ई. ते. बी.ई. या अभ्यासक्रमाच्या तपासून झालेल्या गुणपत्रिकांचे स्कॅनिंग यशस्वीपणे करण्यात आले.

०८. सर्व परीक्षांचे निकाल जाहिर करण्यात आले आहेत. विद्यापीठाच्या १८७ परीक्षांचे निकाल ३० दिवसात तर १९४ परीक्षांचे निकाल ४५ दिवसात जाहिर करण्यात आले.

०९. विद्यापीठाच्या इतिहासात पहिल्यांदाच एम.सी.ए. आणि एम.सी.ए. इंजिनिअरिंग या अभ्यासक्रमाच्या एक विषयाच्या ८५ उत्तरपत्रिका बाह्य स्त्रोत फर्मकडून संपूर्णत: स्कॅनिंग करण्यात आल्या. सदरच्या उत्तरपत्रिका ऑन लाईन इव्हॅल्युशन करण्याचा एक प्रयोगिक तत्वावरील प्रयत्न यशस्वी करण्यात आला.

१०. विद्यापीठाचा दहावा दीक्षांत समारंभ दिनांक २६.०२.२०१५ रोजी मोठ्या थाटात संपन्न झाला. सदर समारंभाचे अध्यक्षस्थान मा. कुलपती सी. विद्यासागर राव यांनी भूषविले तर समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून कर्नाटक केंद्रीय विद्यापीठ, गुलबर्गाचे मा. कुलगुरु डॉ. एम. एन. सुधिंद्र राव यांनी स्नातकांना उद्देशून दीक्षांत भाषण केले. सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग व कामगारमंत्री मा. ना. विजयकुमार देशमुख हे विशेष अतिथी म्हणून

उपस्थित होते. सदर समारंभात प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांना "डॉक्टर ऑफ सायन्स" ही सन्मान पदवी प्रदान करुन गौरविण्यात आले. मा. कुलगुरु सोलापूर विद्यापीठ, प्रा. डॉ. एन. एन. मालदार यांनी स्वागतपर भाषण करुन सोलापूर विद्यापीठाचा आढावा सादर केला. या कार्यक्रमामध्ये एकूण १९ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक तर ८४ विद्यार्थ्यांना विद्यावाचस्पती या पदवीने गौरविण्यात आले. सर्व विद्याशाखेच्या मिळून एकूण २६५० इतक्या विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून पदवी स्विकारली. विद्यापीठाच्या इतिहासात प्रथमच या समारंभाचे थेट प्रक्षेपण (Live Web Casting) करण्यात आले.

"ड" वित्त व लेखा विभाग

०१. मा. महालेखाकार, मुंबई यांना सन २००४ ते २०१० पर्यंत केलेल्या लेखा परीक्षणामधील प्रलंबित १७ परिच्छेदांचा चालू स्थितीचा पूर्ण आक्षेप अनुपालन अहवाल पाठविण्यात आला, त्यापैकी ०७ आक्षेप बाबतचा खुलासा मान्य करण्यात आला व त्याप्रमाणे ०७ आक्षेप वगळण्यात आले आहेत.

०२. विद्यापीठाचे सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाचे संवैधानिक लेखापरिक्षण मे. बाहुबली ए. शहा ॲन्ड कंपनी, सोलापूर यांच्याकडून पूर्ण झाले असून संबंधितांनी सोलापूर विद्यापीठास अहवाल सादर केला आहे. सदर लेखापरिक्षीत वार्षिक लेखे दिनांक २९.०९.२०१४ रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत.

०३. सन २०१४-१५ या आर्थिक वर्षातील माहे डिसेंबर २०१४ ते माहे मार्च २०१५ पर्यंतचे कालावधीकरीता अनुक्रमे प्लॅनसाठी रु. १.४८ कोटी व नॉनप्लॅनसाठी रु. ७६ लाख इतकी तरतुद करण्यात आली.

"ई" संकुले व चर्चासत्रे

०१. पदार्थ विज्ञान संकुलामध्ये विद्यार्थी पालक सभा व विद्यार्थी Alumini Meet चे आयोजन करण्यात आले.

०२. भूशास्त्र संकुलातील पर्यावरण शास्त्र भाग १ व भाग २ व भूमाहिती शास्त्र भाग १ व भाग २ मधील एकूण ३२ विद्यार्थ्यांना C.E.T.P. Plant M.I.D.C., Chincholi व Fire & Safety Dept., M.I.D.C., Chincholi यांची माहिती मिळण्यासाठी श्री. व्ही. पी. धुळप व श्री. एस. पी. बाविस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली भेट दिली.

०३. भूशास्त्र संकुलातील श्रीमती गाजूल एम. डी. यांनी ४th International Conference on Hydrology and Watershed Mangement. JNTU, Hyderabad येथे Hydrogeological & Geophysial Investigation for Groundwater पेपरचे सादरीकरण केले व पेपर प्रकाशित करण्यात आला.

०४. भूशास्त्र संकुलातील तीन विभागातील विद्यार्थ्यांच्या पालक मेळावा व संगणकशास्त्र संकुलात दि. १७ ऑक्टोंबर, २०१४ रोजी विद्यार्थी-पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यास एकूण ८० विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते. यापैकी काही पालकांनी संगणकशास्त्र संकुलाचे परिणामत: सोलापूर विद्यापीठाचे गौरवपूर्ण उल्लेख करुन आपल्या भावना व्यक्त केल्या तसेच श्री. अरविंद टेके यांनी संगणकशास्त्र संकुलातील अभ्यासक्रमाशी निगडीत असे १० पुस्तके भेट दिली.

०५. दि.०२.११.२०१४ रोजी इन्स्टिट्युट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट ॲन्ड रुरल डेव्हलपमेंट (IBMRD) अहमदनगर येथे अयोजित आंतरराष्ट्रीय विद्यापरिषद "International Conference on ICT for Rural Development" मध्ये श्री. मेंते आर., श्री. शिंदे ए., राऊत एस. या शिक्षकांनी सहभाग नोंदवुन शोध निबंधाचे मौखिक सादरीकरण केले.

०६. सामाजिक शास्त्रे संकुलामध्ये पत्रकारिता विभागाने दि.३१.१०.२०१४ रोजी राष्ट्रीय एकता दिनानिमित्त वाद-विवाद स्पर्धेचे आयोजन केले होते. त्यावेळी सामाजिक शास्त्राचे अधिष्ठाता डॉ. निंबाळकर यांनी मार्गदर्शन केले.

०७. सामाजिक शास्त्रे संकुल यांनी तयार केलेला सोलापूर जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक अहवाल यशवंतराव चव्हाण विकास प्रकाशन प्रबोधिनी पुणे यांना सादर केला.

०८. वाणिज्य व व्यवस्थापन संकुलाकडे दि. १०.१०.२०१४ रोजी मा. कुलगुरु महोदयांच्या हस्ते E-Learning चे शुभारंभ करण्यात आले.

०९. सर्व संकुलाकडे नॅकसाठी आवश्यक असणारी तयारी सुरु असून संकुलातील सर्व शिक्षकांना तयारीसाठी प्रत्येक संचालकांनी कामाचे विभाजन केले आहे.

१०. डिपार्टमेंट ऑफ रुरल डेव्हलपमेंट तर्फे दिनांक ०१ व ०२ डिसेंबर, २०१४ रोजी Human Development: Issues and Challenges in Inclusive Growth या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्राचे हॉटेल त्रिपुर सुंदरी, सोलापूर येथे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळेस देशातील नामवंत तज्ञांचा समावेश होता. याकरीता UNDP नवी दिल्ली व यशदा, पुणे यांच्या कडून अर्थिक सहाय्य लाभले.

११. सामाजिकशास्त्रे संकुला अंतर्गत ए.आय.एच.सी. ॲण्ड ए., रुरल डेव्हलपमेंट, अप्लाईड इकॉनॉमिक्स आणि मास कम्युनिकेशन या चारही विभागातील भाग १ व २ मधील शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी दि. २१.११.२०१४ रोजी पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यात बहुसंख्य पालकांनी आपला सहभाग नोंदविला.

१२. सामाजिकशास्त्रे संकुला अंतर्गत ए.आय.एच.सी. ॲण्ड ए., रुरल डेव्हलपमेंट, अप्लाईड इकॉनॉमिक्स आणि मास कम्युनिकेशन या चारही विभागाच्या माजी विद्यार्थ्यांसाठी दि.२२.११.२०१४ रोजी माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात एकूण ९० माजी विद्यार्थी सहभागी झाले.

१३. रसायनशास्त्र संकुलातील विद्यार्थ्यांकडून संकुलाच्या आजूबाजूच्या परीसरातील स्वच्छतेचे काम व झाडांची निगा राखण्याचे काम (कमवा व शिका या योजनेअंतर्गत) नियमितपणे करुन घेण्यात येत आहे.

१४. अप्लाईड इकॉनॉमिक्स, ए.आय.एच.सी. ॲण्ड ए. आणि मास कम्युनिकेशन या विभागाच्यावतीने दिनांक २२ ते २४ डिसेंबर, २०१४ रोजी विद्यार्थ्यांसाठी तीन दिवसीय नेट/सेट परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेस एकूण ६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

१५. पत्रकारिता विभाग व सोलापूर पत्रकार श्रमिक संघ यांचे संयुक्त विद्यमाने दिनांक ०१ व ०२ जानेवारी, २०१५ रोजी "पत्रकारितेतील नवे प्रवाह" या विषयावर दोन दिवसांच्या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. सदर चर्चासत्रास बहुसंख्येने पत्रकार व विद्यार्थीवर्ग उपस्थित होता.

१६. संगणकशास्त्र संकुलात दि. १५.१२.२०१४ रोजी IT Skill Development प्रशिक्षणाचा समारोप करण्यात आला. यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव श्री. एस. के. माळी, संकुलाचे डॉ. व्ही. बी. घुटे, प्रकल्प समन्वयक डॉ. आर. एस. मेंते तसेच संकुलाकडील सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. या प्रशिक्षणात संकुलातील MCA व M.Sc. (C.Sc.) च्या ८० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

१७. दिनांक ०३ जानेवारी, २०१५ रोजी सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त संगणकशास्त्र संकुल परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

१८. पदार्थ विज्ञान संकुलाकडे दिनांक ०५ व ०६ फेब्रुवारी, २०१५ रोजी "Latest Developments in Material Characterization Techniques" या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. सदर चर्चासत्रास एकूण २४७ मान्यवरांनी सहभाग नोंदविला तर ०७ शास्त्रज्ञांनी यामध्ये मार्गदर्शन केले.

१९. प्रस्तुत विद्यापीठातील जनविकास केंद्रातंर्गत सामाजिकशास्त्रे संकुलामध्ये शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये सुरु करण्यात येत असलेल्या रशियन व चिनी भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रमाविषयी माहिती देण्यासाठी दिनांक ३१ जानेवारी, २०१५ रोजी परिसंवादाचे आयोजन करण्यात आले.

२०. संगणकशास्त्र संकुलामध्ये दिनांक २९.०१.२०१५ रोजी eSolve Knowledge Services Pvt. Ltd., Pune या कंपनी तर्फे एम.एस्सी. भाग-२ (संख्याशास्त्र, रसायनशास्त्र, गणित व पदार्थ विज्ञान) या विषयांच्या विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस इंटरव्ह्यू घेण्यात आल्या. त्यामधून संख्याशास्त्र विषयातून एक व रसायनशास्त्र या विषयातून एक अशा दोन विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

२१. संगणकशास्त्र संकुलातील एम.सी.ए. भाग-३ मधील कु. अमृता जगताप या विद्यार्थिनीस दिनांक ३० व ३१ जानेवारी, २०१५ रोजी झालेल्या "UGC National Conference on Applied Mathematics" या राष्ट्रीय परिषदेमध्ये "Analysis, Algebra & Computational Mathematics" या विषयावर उत्तम पेपर सादरीकरणाचे बक्षीस मिळाले.

२२. संगणकशास्त्र संकुलात दिनांक २८.०२.२०१५ रोजी गणित विषयावर "Fuzzy Mathematics and its Application" या राष्ट्रीय चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले. सदर चर्चा सत्रात एकूण १३९ विद्यार्थी व ४८ शिक्षक सहभागी झाले.

२३. संगणकशास्त्रे संकुलातील संगणकशास्त्र विषयाचे सहाय्यक प्राध्यापक श्री. एस. डी. राऊत यांचा संशोधन पेपर हाँगकाँग, चीन येथे आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये सादर करण्यासाठी स्वीकृत झाला.

२४. सामाजिकशास्त्रे संकुलातील ॲप्लाईड इकॉनॉमिक्स विभागाच्यावतीने दिनांक २० व २१ फेब्रुवारी, २०१५ रोजी प्रा. डॉ. एस. चंद्रकांत (RBI Chair Professor, CSD, Hyderabad) यांचे "Research Methodology in Economics" या विषयावर दररोज तीन व्याख्याने

आयोजित करण्यात आली होती. सदर व्याख्यानाचा लाभ अर्थशास्त्र विषयातील एम.ए. भाग १ व २ च्या विद्यार्थ्यांनी आणि पीएच.डी. संशोधकांनी घेतला.

२५. गरीब व होतकरु एकूण ४० विद्यार्थ्यांना किमान रु. २५००/- इतक्या रक्कमेची पुस्तके देण्याची प्रक्रिया ग्रंथालयाकडून करण्यात आली.

**"फ" राष्ट्रीय सेवा योजना**

०१. NATIONAL ACADEMY OF CONSTRUCTION, ASTI, Bommoru, East Godavari Dist., (AP) या ठिकाणी दि. १२ ते २१ ऑक्टोबर, २०१४ या कालावधीत (West Zone NSS Pre-Republic Day Parade Camp-२०१४) संपन्न झाला. या कॅम्पमध्ये विद्यापीठ संलग्नित राष्ट्रीय सेवा योजनेचे ०१ स्वयंसेविका यांनी सहभाग नोंदविला.

०२. सार्वत्रिक विधानसभा निवडणूक- २०१४ साठी स्वीप अंतर्गत हाती घेण्यात आलेल्या मोहिमेच्या अनुषंगाने मतदारांमध्ये मतदान करण्याबाबत जनजागृती करुन शंभर टक्के मतदान होण्याच्या दृष्टीने सोलापूर विद्यापीठ संलग्नित राष्ट्रीय सेवा योजना मार्फत महाविद्यालयांनी विविध कार्यक्रमाचे/स्पर्धेचे/रॅलीचे आयोजन केले.

०३. डॉ. हेडगेवार रक्तपेढी, सोलापूर ही रक्तपेढी सन २०१४-१५ हे वर्ष रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करीत असल्याने त्याअनुषंगाने विविध उपक्रमांचे आयोजन केले होते त्यामध्ये विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरीता निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती या स्पर्धेत राष्ट्रीय सेवा योजना एकक असलेल्या महाविद्यालयांतील स्वयंसेवकांनी विद्यापीठाने कळविल्यानुसार मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.

०४. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने जादूटोणा विरोधी कायद्याची जनजागृती प्रचार व प्रसार कार्यक्रम अंमलबजावणी समिति यांनी दिनांक २८.११.२०१४ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता किर्लोस्कर सभागृह, हिराचंद नेमचंद वाचनालय येथे समितीचे सह अध्यक्ष प्रा. श्याम मानव यांचे प्रात्यक्षिकासह व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सदर कार्यक्रमास सोलापूर शहरातील राष्ट्रीय सेवा योजना एकक असलेल्या प्रत्येक महाविद्यालयांतील ५० स्वयंसेवकांनी व कार्यक्रम अधिकाऱ्यांनी आपला सहभाग नोंदविला.

०५. अहमदनगर कॉलेज, अहमदनगर येथे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांच्याकरीता दिनांक १९.११.२०१४ रोजी ते दिनांक २३.११.२०१४ या कालावधीत एकूण पाच दिवसांची कार्यशाळा आयोजित केली होती. सदर कार्यशाळेस राष्ट्रीय सेवा योजना एकक असलेल्या सोलापूर विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांचे एकूण चार कार्यक्रम अधिकारी यांनी आपला सहभाग नोंदविला.

०६. राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमांतर्गत दिनांक ०१ डिसेंबर, २०१४ रोजी सकाळी ०८.०० वाजता श्री. छत्रपती शिवजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथून जागतिक एड्स दिनानिमित्त आयोजित प्रभातफेरीमध्ये मा. कुलगुरु प्रा. डॉ. एन. एन. मालदार आणि सोलापूर शहरातील एकूण ०९ महाविद्यालयातील प्रत्येक ५० राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी यांनी आपला सहभाग नोंदविला.

०७. सन २०१४-१५ करीता ९२०० इतक्या शासनमान्य विद्यार्थी संख्येचे वितरण विद्यापीठ संलग्नित एकूण ५९ महाविद्यालयांच्या विद्यार्थी मागणी अर्जानुसार करण्यात आले. त्यानुसार एकूण ५६ महाविद्यालयाकडून८२५७ इतकी विद्यार्थी संख्या सन २०१४-१५ करीता प्रत्यक्षात प्रवर्गनिहाय नोंदणी करण्यात आली आहे.

०८. दिनांक २८ डिसेंबर, २०१४ रोजी एड्स बाधित मुलांसाठी गंमत जंमत मेळावा सकाळी ९ ते ५ या वेळेत पालवी येथे आयोजित करण्यात आला. या मेळाव्यास राष्ट्रीय सेवा योजना एकक असलेल्या विविध महाविद्यालयातील स्वयंसेवकांनी व कार्यक्रम अधिकारी यांनी आपला सहभाग नोंदविला.

०९. सन २०१४-१५ या वर्षाचे प्रेरणा राज्यस्तरीय नेतृत्व गुणविकास शिबीर प्रथमच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे दिनांक २७ ते ३१ डिसेंबर, २०१४ या कालावधीत संपन्न झाला. या शिबीरामध्ये प्रस्तुत विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे ०२ स्वयंसेवक, ०२ स्वयंसेविका व ०१ कार्यक्रम अधिकारी यांनी सहभाग नोंदविला. या शिबीरामध्ये प्रस्तुत विद्यापीठाच्या ०२ स्वयंसेविकांना सर्वोत्कृष्ठ स्वयंसेविक म्हणून गौरविण्यात आले.

१०. 'रस्ता सुरक्षा दशक' अभियांनातर्गत पुरस्कार निवडीसाठी संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय व विद्यापीठस्तरीय निवड समितीचे मुळ अहवाल आणि पुरस्कारासाठी निवड केलेल्या महाविद्यालयांचे प्रस्ताव राज्य समिती, वाहतुक विभाग यांच्याकडे पुढील कार्यवाहिस्तव पाठविण्यात आले.

११. दिनांक २० ते २५ जानेवारी, २०१५ रोजी मतदान जनजागृती करण्याकरीता आयोजित विविध स्पर्धा, पथनाट्य, मतदान जनजागृती रॅली यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना एकक असलेल्या महाविद्यालयातील स्वयंसेवकांनी आपला सहभाग नोंदविला.

१२. मोटार वाहन अपघातास आळा घालण्याच्या दृष्टिकोनातून दिनांक ११ ते २५ जानेवारी, २०१५ या कालावधीत "रस्ता सुरक्षा अभियान २०१५" राज्यभर राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला. त्या अनुषंगाने राष्ट्रीय सेवा योजना एकक असलेल्या महाविद्यालयामध्ये सदर अभियान यशस्वीपणे संपन्न झाले.

१३. रस्ता सुरक्षा अभियान २०१५ करीता शैक्षणिक वर्ष २०१४-१५ दरम्यान घेण्यात आलेल्या विद्यापीठातंर्गत स्पर्धेमध्ये प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित राष्ट्रीय सेवा योजना एकक असलेल्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयास सरासरी १०० गुणापेक्षा जास्त गुण मिळाल्याने दिनांक ३१ जानेवारी, २०१५ रोजी नागपूर येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमामध्ये मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते प्रशंसापत्र देवून गौरव करण्यात आला.

१४. सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षामध्ये राष्ट्रीय सेवा योजना एकक असलेल्या एकूण ५६ महाविद्यालयापैकी ३६ महाविद्यालयांची ३४ गावांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विशेष श्रमसंस्कार शिबीरे संपन्न झाली. यामध्ये एकूण २९७४ स्वयंसेवक सहभागी झाले.

१५. राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांसाठी राष्ट्रीय एकात्मता शिबीर दिनांक ०९.०२.२०१५ ते १५.०२.२०१५ या कालावधीत गुलबर्गा विद्यापीठ, गुलबर्गा या ठीकाणी संपन्न झाले. या

शिबीरासाठी प्रस्तुत विद्यापीठाचे १० स्वयंसेवक व १ संघव्यवस्थापक असा एकूण ११ जणांचा संघ सहभागी झाला.

**"ग" क्रीडा व विद्यार्थी कल्याण**

०१. पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ व्हॉलीबॉल (मुले) स्पर्धा मोहनलाल सुखाडीया विद्यापीठ, उदयपूर येथे दि. १४.१०.२०१४ ते १८.१०.२०१४ याकालावधीत संपन्न झाल्या. सदर स्पर्धेत विद्यापीठाचा संघ सहभागी झाला.

०२. आखिल भारतीय आंतर विद्यापीठ जलतरण (स्विमिंग) व डायव्हिंग स्पर्धेचे जैन विद्यापीठ, बंगलोर येथे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यापीठातर्फे १० मुले व ०३ मुली यांचा संघ सहभागी झाला व कु. स्वाती विडप या विद्यार्थीनीने हायबोर्ड स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले. तसेच तीन मीटर स्प्रिंग बोर्डमध्ये रजत पदक मिळविले. याचप्रमाणे स्विमिंग व डायव्हिंग मुलीची जनरल चॅम्पियनशिप विद्यापीठामध्ये खेचून आणली व आंतर विद्यापीठ स्तरावर सोलापूर विद्यापीठाने वर्चस्व कायम ठेवले आहे.

०३. राज्यपालभवन, मुंबई आयोजित आंतर विद्यापीठ इंद्रधनुष्य युव महोत्सव श्री. संत गाडगेबाब अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे दि. ०५.११.२०१४ ते ०९.११.२०१४ दरम्यान संपन्न झाला. विविध कला प्रकारात सहभागी होण्यासाठी सोलापूर विद्यापीठाचा एकूण ४० कलाकारांचा संघ सामील झाला. तसेच एकूण २४ कलाप्रकारासाठी सराव शिबीराचे आयोजन सोलापूर विद्यापीठात दि. २०.१०.२०१४ ते दि. ०३.११.२०१४ दरम्यान करण्यात आले होते. या स्पर्धेत सोलापूर विद्यापीठाने शोभायात्रेमध्ये प्रथम पारितोषिक, मातीकाम स्पर्धेत द्वितीय क्रमांक, रजत तर नकला व मुकनाट्यमध्ये दोन तृतीय क्रमांक, कांस्य अशी एकूण चार पारितोषिके पटकाविली.

०४. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे दि. ०५.११.२०१४ ते ०९.११.२०१४ या दरम्यान पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ हॅन्डबॉल स्पर्धा अयोजित केल्या होत्या. सदर स्पर्धेत विद्यापीठाच्या संघाने विशेष कामगिरी करत अतिशय अटितटीच्या सामन्यात विजय प्राप्त करीत विद्यापीठास पश्चिम विभागाचे उपविजेताची ट्रॉफी मिळवून जम्मु विद्यापीठ येथे होणाऱ्या आाखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्तरावर सोलापूर विद्यापीठाने प्रवेश केला. विद्यापीठ हॅन्डबॉल (मुले/मुली) संघास मार्गदर्शक श्री. आनंद चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.

०५. महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धा डॉ. बाबासाहेब मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे दिनांक २७.११.२०१४ ते दिनांक ०१.१२.२०१४ या दरम्यान संपन्न झाल्या. सदर क्रीडा महोत्सवात सोलापूर विद्यापीठाकडून एकूण ७२ मुले व ७२ मुली (प्रत्येकी सहा मुला मुलींचे एकूण १२ संघ) आणि १२ संघव्यवस्थापक सहभागी झाले होते. यामध्ये तलवारबाजी (मुले) या खेळात एकूण रौप्य ०२ व कास्य ०९ पदके प्राप्त झाली. मैदानी खेळात सुवर्ण ०२, रौप्य ०१ आणि कास्य ०१ अशी पदके प्राप्त झाली तर बास्केटबॉल (मुले) या खेळात एकूण १२ कास्य पदके विद्यापीठास प्राप्त झाली आहेत. विद्यापीठाच्यावतीने सर्व यश संपादित खेळाडूंचे कौतुक करण्यात आले.

०६. ३० वा पश्चिम विभागीय युवा महोत्सव महर्षी दयानंद विद्यापीठ, अजमेर येथे दिनांक १९.११.२०१४ ते दिनांक २३.११.२०१४ या कालावधीत आयोजित करण्यात आला होता. यामध्ये विविध कला प्रकारात सहभागी होण्यासाठी विद्यापीठाचा एकूण ४० कलाकारांचा संघ सामील झाला होता. या महोत्सवात सोलापूर विद्यापीठास व्यंगचित्र या कला प्रकारात द्वितीय क्रमांक मिळाला.

०७. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बेसबॉल स्पर्धेचे आयोजन आचार्य नागार्जुन विद्यापीठ, गुंटूर येथे दिनांक ०३ जानेवारी, २०१५ ते ०७ जानेवारी, २०१५ या दरम्यान करण्यात आले. सदर स्पर्धेसाठी प्रस्तुत विद्यापीठातील मुला व मुलींच्या संघाने आपला सहभाग नोंदविला.

०८. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ पॉवर लिफ्टींग व वेट लिफ्टींग, बेस्टफीजीक मुले, मुली या स्पर्धेचे आयोजन पंजाब टेक्निकल विद्यापीठ, जालिंदर येथे दिनांक ०२ ते ०६ जानेवारी, २०१५ या कालावधीत करण्यात आले होते. सदर स्पर्धेसाठी प्रस्तुत विद्यापीठातील मुला-मुलींच्या संघाने सहभाग नोंदविला.

०९. पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ खो-खो मुली स्पर्धाचे आयोजन जे. आर. एन. विद्यापीठ, उदयपूर येथे दिनांक ०५ ते १० जानेवारी, २०१५ या दरम्यान केले होते. सदर स्पर्धेत सहभाग नोंदविण्यासाठी प्रस्तुत विद्यापीठातील मुलींच्या संघाने सहभाग नोंदविला.

१०. आखिल भारतीय आंतर विद्यापीठ कुस्ती स्पर्धा कुरुक्षेत्र विद्यापीठ येथे दिनांक १९ ते २५ जानेवारी, २०१५ दरम्यान आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर स्पर्धेत प्रस्तुत विद्यापीठातुन मुले व मुलींच्या संघाने आपला सहभाग नोंदविला.

११. पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ खो-खो स्पर्धेचे आयोजन जे. आर. एन. विद्यापीठ, उदयपूर येथे दिनांक २६ ते ३० जानेवारी, २०१५ या दरम्यान केले होते. सदर स्पर्धेत प्रस्तुत विद्यापीठातून मुले व मुलींच्या संघाने आपला सहभाग नोंदविला.

सदर बैठकीत पुढीलप्रमाणे कामकाज झाले.

**[ १ ] अधिसभेच्या दि.१५ नोव्हेंबर, २०१४ रोजी झालेल्या नवव्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

(टिपणी: सर्व अधिसभा सदस्यांना परिनियम क्र.४८५ नुसार विद्यापीठ पत्र जा.क्र. सोविसो/सनिवि/अधिसभा/९०४६, दि.१२/१२/२०१४ अन्वये, दि.१५ नोव्हेंबर, २०१४ रोजी झालेल्या नवव्या बैठकीचा कार्यवृत्तांत पाठविण्यात आलेला होता. या कार्यवृत्तांतामध्ये दुरुस्त्या सुचविण्याची अंतिम तारीख दि.०९/०१/२०१५ अशी होती. या मुदतीत कोणत्याही सदस्यांकडून दुरुस्त्या प्राप्त झालेल्या नाहीत.

सबब, अधिसभेचा दि.१५ नोव्हेंबर, २०१४ रोजी झालेल्या नवव्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यासाठी मान्यतेसाठी सादर).

ठराव: **अधिसभेच्या दि.१५ नोव्हेंबर, २०१४ रोजी झालेल्या नवव्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला.**

[ २ ] अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यांना दिली जाणारी उत्तरे तसेच पूरक प्रश्न व त्यांना द्यावयाची उत्तरे, परिनियम ४७६(८) च्या तरतूदीमधील विनिर्दिष्टप्रमाणे अधिसभा सदस्यांना अन्य सदस्याने विचारलेल्या प्रश्नास दोन पूरक प्रश्न विचारता येतील.

(टिपणी: परिनियमानुसार स्विकृत केलेले प्रश्न आणि त्यांना व्यवस्थापन परिषदेने तयार केलेल्या उत्तराचे विवरणपत्र परिनियम क्र.४७६(७) अन्वये पाठविण्यात येईल).

ठराव: अ) प्रश्नोत्तराचा तास दुपारी १२:३२ वाजता सुरु झाला व दुपारी ०१:२९ वाजता संपला.
ब) प्रश्नोत्तराच्या तासामध्ये विचारलेले प्रश्न, उपप्रश्न व त्यावर देण्यात आलेली उत्तरे याची प्रत सोबत जोडली आहे. (जोडपत्र "अ")

[ ३ ] **विद्यापीठाचे सन २०१४-१५ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१५-१६ च्या मूळ अंदाजपत्रकाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

श्री. बी. एस. सलगर यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने खालील प्रस्ताव सादर केलेला आहे.

"ही अधिसभा वित्त व लेखा समितीने व व्यवस्थापन परिषदेने दुरुस्तीसह केलेल्या शिफारशी विचारात घेऊन असा ठराव करते की, व्यवस्थापन परिषदेने सन २०१४-१५ च्या सुधारीत अंदाजपत्रक व २०१५-१६ च्या मूळ अंदाजपत्रकाबाबत केलेली शिफारशी मान्य करुन मंजूर करण्यात याव्यात".

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७५ (२) (ө) आणि १०१ नुसार विद्यापीठाचे सन २०१४-१५ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१५-१६ चे मूळ अंदाजपत्रक तयार करण्याकरीता महाराष्ट्र विद्यापीठे समान लेखा संहिता कलम २.१२ नुसार खालीलप्रमाणे अर्थसंकल्प उपसमिती गठीत करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १) | प्रा. डॉ. ए. ए. शेख | अध्यक्ष |
| २) | श्री. बी. आर. गायकवाड | सदस्य |
| ३) | प्राचार्य एस. के. पवार | सदस्य |
| ४) | प्रा. डॉ. व्ही. बी. घुटे | तज्ञ सदस्य |
| ५) | श्री. एस. बी. अनपट | सचिव |

उपरोक्त उपसमितीने दि.०७ व ०८ जानेवारी, २०१५ रोजी सर्व विभाग व संकुल प्रमुख यांचेसमवेत बैठक घेऊन व त्यांचेशी चर्चा करुन तयार केलेले सन २०१४-१५ चे सुधारीत अंदाजपत्रक व २०१५-१६ चे मूळ अंदाजपत्रक वित्त व लेखा समितीच्या दि.११/०२/२०१५ रोजी झालेल्या बैठकीसमोर विषय क्र.०३ नुसार सादर केले असता, त्यावर सर्वकष चर्चा होऊन काही दुरुस्त्या सुचविण्यात आल्या व त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

| | |
|---|---|
| ठराव : | सन २०१४-१५ च्या सुधारीत अंदाजपत्रकास व सन २०१५-१६ च्या मूळ अंदाजपत्रकास दुरुस्तीसह व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. |

वरीलप्रमाणे वित्त व लेखा समितीची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या दि.२०/०२/२०१५ रोजी झालेल्या बैठकीत विषय क्र.०९ अन्वये विचारार्थ सादर केली असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

| | |
|---|---|
| ठराव : | विद्यापीठाचे सन २०१४-१५ चे सुधारीत अंदाजपत्रक व २०१५-१६ च्या मूळ अंदाजपत्रकास दुरुस्तीसह सर्वानुमते अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली. |

सबब, विद्यापीठाचे सन २०१४-१५ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१५-१६ च्या मूळ अंदाजपत्रकाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

**ठराव:** **ॲड. श्री. सलगर बी. एस. यांनी सदरचा प्रस्ताव मांडल्यानंतर त्यास प्राचार्य डॉ. हलकुडे एस. ए., डॉ. आवताडे एच. के. व श्री. जमादार के. एम. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर खालील अधिसभा सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले.**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | डॉ. चव्हाण सी. एस. | ७) | डॉ. जुंदळे एस. बी. |
| २) | डॉ. बचुटे एम. टी. | ८) | प्राचार्य डॉ. चौधरी बी. व्ही. |
| ३) | प्राचार्य डॉ. फरताडे एम. एम | ९) | प्राचार्य डॉ. कोळेकर सी. बी. |
| ४) | डॉ. पवार एन. बी. | १०) | श्री. रिसबूड एस. एच. |
| ५) | डॉ. बारबोले ए. एन. | ११) | प्राचार्य डॉ. हलकुडे एस. ए. |
| ६) | श्री. घागरे एम. व्ही. | १२) | डॉ. रोंगे बी. पी. |

**त्यानंतर सन २०१४-१५ च्या सुधारीत अंदाजपत्रकावर व सन २०१५-१६ च्या मूळ अंदाजपत्रकावर मुद्देसूद चर्चा झाली व सदर प्रस्ताव सूचना व दुरुस्तीसह सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**[ ४ ] सोलापूर विद्यापीठाने महाराष्ट्र शासनाच्या दि.१४ सप्टेंबर, २००९ च्या आदेशानुसार आणि वेळोवेळी प्राप्त शुध्दीपत्रानुसार विविध अधिकारमंडळाच्या सदस्यांच्या पात्रतेबाबत नव्याने तयार केलेल्या परिनियमांपैकी SUSS.३०८, ३५७, ३८९, ३९० व Appendix IV यामध्ये केलेली दुरुस्ती अधिसभेच्या विचारार्थ.**

(टिपणी: सोलापूर विद्यापीठाने महाराष्ट्र शासनाच्या दि.१४ सप्टेंबर, २००९ च्या आदेशानुसार आणि वेळोवेळी प्राप्त शुध्दीपत्रानुसार, विविध अधिकारमंडळाच्या सदस्यांच्या पात्रतेबाबत नव्याने तयार केलेले परिनियम SUSS.३०१ ते SUSS.३८६, परिशिष्ट III, IV V आणि दीक्षांतसंदर्भातील परिनियम SUSS.३८७ ते SUSS.३९० या परिनियमांना अधिसभेने दि.१५/०३/२०१४ च्या बैठकीतील विषय क्र.४ अन्वये मान्यता दिलेली आहे.

सदरचे परिनियम मा.कुलपती यांच्या कार्यालयास मान्यतेसाठी पाठविण्यापूर्वी विद्याशाखेच्या अधिष्ठातांनी त्यांच्या बैठकीत Commerce या विद्याशाखे ऐवजी Commerce and Managment असा नावात बदल करावा आणि अभियांत्रिकी विद्याशाखेतून फार्मसी हा विषय वेगळा करुन औषधनिर्माणशास्त्र (फार्मसी) ही स्वतंत्र विद्याशाखा गठीत करावी अशी विद्या परिषदेस शिफारस केली होती.

विद्या परिषदेने दि.१६/०८/२०१४ रोजीच्या बैठकीतील विषय क्र. ११३(८) व ११३(९) नुसार अधिष्ठातांच्या बैठकीतील शिफारस मान्य करुन त्यानुसार व्यवस्थापन परिषदेस शिफारस केली होती. व्यवस्थापन परिषदेने दि.२३/०९/२०१४ रोजीच्या बैठकीतील विषय क्र. ०५ व ०६ नुसार सदरचे बदल मान्य करण्याबाबत अधिसभेस शिफारस केली आहे. परंतु, या विषयामध्ये वाणिज्य विद्याशाखा व औषधनिर्माणशास्त्र (फार्मसी) विद्याशाखेत अंतर्भूत करावयाच्या अभ्यासमंडळे / विषयाची नावे दिलेली नसल्याने, हा विषय व्यवस्थापन परिषदेच्या दि.२३/१२/२०१४ च्या बैठकीत विषय क्र.१० अन्वये पुनश्च: सादर केला होता. यामध्ये ज्या त्या विद्याशाखेतील सर्व संबंधित विषयाचा समावेश करुन या बदलाची अधिसभेस शिफारस करण्यात आली आहे.

सबब, Commerce या विद्याशाखेऐवजी Commerce and Management असा नावात बदल करुन व अभियांत्रिकी विद्याशाखेतून औषधनिर्माणशास्त्र (फार्मसी) ही विद्याशाखा वेगळी करुन सोबत जोडलेल्या परिनियम SUSS.३०८, ३५७, ३८९, ३९० व Appendix IV यामध्ये आवश्यक त्या केलेल्या दुरुस्त्या अधिसभेच्या विचारार्थ सादर).

ठराव: **सोलापूर विद्यापीठाने महाराष्ट्र शासनाच्या दि.१४ सप्टेंबर, २००९ च्या आदेशानुसार आणि वेळोवेळी प्राप्त शुध्दीपत्रानुसार विविध अधिकारमंडळाच्या सदस्यांच्या पात्रतेबाबत नव्याने तयार केलेल्या परिनियमांपैकी SUSS.३०८, ३५७, ३८९, ३९० व Appendix IV यामध्ये व्यवस्थापन परिषदेने सुचविलेली दुरुस्ती व अधिसभेने सुचविलेल्या खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**अ) "विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी कायदा-१९५६ च्या कलम २२ अन्वये मान्यता असलेल्या शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या सर्व पदव्यांचा समावेश करुन" या दुरुस्तीसह वरीलप्रमाणे परिनियम SUSS.३०१ ते SUSS.३८६, परिशिष्ट III, IV V आणि दीक्षांतसंदर्भातील परिनियम SUSS.३८७ ते SUSS.३९० मा. राज्यपाल यांच्या मान्यतेसाठी पाठवावे असे ठरले.**

**[ ५ ] महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने तयार केलेला, व्यवस्थापन परिषदेने व विद्यापरिषदेने शिफारस केलेला शै.वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाचा दिर्घकालिन शैक्षणिक बृहत आराखडा अधिसभेच्या विचारार्थ.**

(टिपणी: म. वि. कायदा १९९४ कलम ८२ (१) मध्ये बृहत आराखडयाबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे. म. वि. कायदा १९९४ कलम ८२ (१) तरतूद - The university shall prepare a perspective plan and get the same approved by the State Council for Higher Education for educational development for the location of colleges and institutions of higher learning in a manner ensuring equitable distribution of facilities for having due regard, in particular, to the need of unnerved and under -developed areas within the jurisdiction of the university. Such plan shall be prepared by BCUD and shall be placed before the Academic Council and the Senate through the Management Council and shall, if necessary, be updated every year.

शै.वर्ष २०११-१२ ते २०१५-१६ या पाच वर्षाच्या बृहत आराखडयाचा कालावधी संपणार असून शै.वर्ष २०१६-१७ पासून नवीन महाविद्यालय सुरु करण्याचे प्रस्ताव स्विकारण्यासाठी सन २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षीय शैक्षणिक बृहत आराखडा तयार करावा लागणार आहे.

सदरबाबतचा विषय दि.१५/७/२०१४ रोजीच्या महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाच्या बैठकीमध्ये ठेवण्यात आला असता खालीलप्रमाणे ठराव करण्यात आलेला होता.

१. शै. वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाच्या दिर्घकालीन बृहत आराखडा तयार करण्याकरिता स्थानिक वर्तमानपत्रामध्ये जाहिर निवेदन देऊन वेगवेगळया संस्था / महाविद्यालयाकडून सुचना मागवून घेण्यात याव्यात.
२. शै. वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाच्या दिर्घकालीन बृहत आराखडा तयार करण्याकामी एक उपसमिती नेमण्याचे अधिकार मा. कुलगुरुमहोदय यांना देण्यात आले.
३. सदर बृहत आराखडा बाबतचा उपसमितीचा अहवाल पुढील महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाच्या बैठकीमध्ये सादर करण्यात यावा.

उपरोक्तप्रमाणे करण्यात आलेल्या ठरावाप्रमाणे शै.वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाच्या दिर्घकालीन बृहत आराखडा तयार करण्याकरीता स्थानिक वर्तमानपत्रामध्ये जाहिर निवेदन देऊन वेगवेगळया संस्था/महाविद्यालयाकडून सुचना मागवुन घेण्यात आलेले होते. तसेच महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने दिलेल्या अधिकारान्वये मा.कुलगुरु महोदयांनी शै.वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाचा दिर्घकालिन बृहत आराखडा तयार करण्याकामी खालीलप्रमाणे उपसमिती नियुक्ती केलेली होती.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रा. डॉ. एन. एन. मालदार | | | | अध्यक्ष |
| २. | श्री धर्मराज काडादी | सदस्य | ३. | डॉ.बी.वाय.यादव | सदस्य |
| ४. | प्राचार्य, डॉ.ए.एल.देशमुख | सदस्य | ५. | प्राचार्य, डॉ.जी.एन.चिट्टे | सदस्य |
| ६. | प्राचार्य, डॉ.एस.ए.हलकुडे | सदस्य | ७. | प्राचार्य, एस.के.पवार | सदस्य |
| ८. | प्रा, डॉ.एस.एस.सुर्यवंशी | सदस्य | ९. | डॉ.महादेव देशमुख | सदस्य |
| १०. | डॉ.डी.जी.कदम | सदस्य | ११. | डॉ.श्रीकांत येळेगावकर | सदस्य |
| १२. | डॉ.पी.प्रभाकर | सदस्य | १३. | प्राचार्य, आर.वाय.पाटील | सदस्य |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४. | डॉ.व्ही. पी.उबाळे | सदस्य | १५. | डॉ.गौतम कांबळे | सदस्य |
| १६. | डॉ.ए.एम.रंगरेज | सदस्य | १७. | डॉ.ॲनी जॉन | सदस्य |
| १८. | डॉ.पी.पी.वडगावकर | सदस्य | १९. | डॉ.जी.के.देशमुख | सदस्य |
| २०. | डॉ.एस.एन.सलवदे | सदस्य | २१. | प्राचार्य, डॉ.एम.ए.दलाल | सदस्य |
| २२. | श्री शरद ठाकरे | सदस्य | २३. | श्री.राम रेडडी | सदस्य |
| २४. | श्री उल्हास पाटील | सदस्य | २५. | श्री के.एम.जमादार | सदस्य |
| २६. | प्राचार्य डॉ. बी. एम. भांजे | | | | सदस्य सचिव |

सदर उपसमितीची मा.कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दि.०७/११/२०१४ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये वेगवेगळया व्यक्ती तथा संस्थांकडून प्राप्त झालेले निवेदने सादर करुन प्रस्तुत विद्यापीठाचा शै.वर्ष २०१५-१६ ते २०२०-२१ या पाच वर्षाच्या दिर्घकालिन बृहत आराखडा तयार करण्यात आलेला होता तसेच प्रस्तुत विद्यापीठातील सर्व संकुलाचे संचालक यांचेशी चर्चा करुन विद्यापीठ परिसरातील अभ्यासक्रमांचा बृहत आराखडा तयार करण्याचे अधिकार मा.कुलगुरु महोदयांना देण्यात आलेले होते.

उपरोक्तप्रमाणे बृहत आराखडा उपसमितीने तयार केलेला शै.वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाकरीता नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठीचा दिर्घकालिन बृहत आराखडा तसेच विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलाच्या संचालकांशी चर्चा करुन विद्यापीठ परिसरातील अभ्यासक्रमाचे मा.कुलगुरुमहोदयांनी तयार केलेला बृहत आराखडा दि. १०/१२/२०१४ रोजीच्या महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळासमोर विषय क्र.३ अन्वये विचारार्थ सादर केला असता महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने सोबत जोडल्याप्रमाणे शै.वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाचा दिर्घकालिन शैक्षणिक बृहत आराखडा तयार करुन सदर बृहत आराखडा व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेला होता.

महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने तयार केलेला शै.वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाचा तयार केलेला शैक्षणिक बृहत आराखडा दि.२३/१२/२०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये विचारार्थ सादर केले असता ठराव क्र.०६ अन्वये व्यवस्थापन परिषदेने सदर बृहत आराखडा विद्यापरिषदेस दुरुस्तीसह (बार्शी येथे कला आणि वाणिज्य अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयाचा समावेश) सुधारीत बृहत आराखडा तयार करुन सदर बृहत आराखडा विद्यापरिषदेला शिफारस केलेला होता. व्यवस्थापन परिषदेने केलेल्या शिफारशीला अनुसरुन सदरबाबतचा विषय दि.१७/१/२०१५ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीमध्ये सादर केले असता विद्यापरिषदेने ठराव क्र.११० अन्वये अधिसभेला शिफारस केलेला आहे.

तसेच, उपरोक्त बृहत आराखडयाला अनुसरुन चेअरमन, सी.जी.आगासे ट्रस्ट, पुणे यांचे कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे नवीन वरिष्ठ महाविद्यालयासाठी बृहत आराखडयात श्रीपूर गावचे नांव समाविष्ठ करुन घेणेबाबतचे दि. ०३/०२/२०१५ रोजीचे प्राप्त निवेदन विचारार्थ सादर.

सबब, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने तयार केलेला, व्यवस्थापन व विद्यापरिषदेने शिफारस केलेला शै.वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाचा दिर्घकालिन शैक्षणिक बृहत आराखडा अधिसभेच्या विचारार्थ).

ठराव: शै.वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाच्या दिर्घकालिन शैक्षणिक बृहत आराखड्यास डॉ. बारबोले ए. एन. यांनी अनुमोदन दिले. या प्रस्तावावर खालील अधिसभा सदस्यांनी विचार व्यक्त केले.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | डॉ. बारबोले ए. एन. | २) | डॉ. बचुटे एम. टी. |
| ३) | प्राचार्य डॉ. देशमुख ए. एल. | ४) | डॉ. रोंगे बी. पी. |

यांनी विचार मांडल्यानंतर शै.वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाच्या दिर्घकालिन शैक्षणिक बृहत आराखड्यास खालीलप्रमाणे दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

१) पान क्र.७६ वर “Engineering faculty” ऐवजी “Engineering & Technology faculty” अशी दुरुस्ती करण्यात यावी.

२) पान क्र.७७ वर अ.क्र.२५ मध्ये दुसऱ्या ओळीमध्ये “which are proposed” ऐवजी “which are not proposed” अशी दुरुस्ती करण्यात यावी.

[ ६ ] अधिसभा सदस्य श्री. गायकवाड आर. एस. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"पी. एच. डी अर्हताधारक असणा-या सहा.प्राध्यापक पदाच्या पात्रतेसाठी पदवी परीक्षेत ४५ टक्के गुण आवश्यक या अटीतून यू. जी. सी च्या नियमा" प्रमाणे सुट मिळावी असा ठराव ही अधि सभा विद्या परिषदेस करत आहे."

ठराव: सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. रोंगे बी. पी. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा ठराव मागे घेण्याबाबत श्री. गायकवाड आर. एस. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.

[ ७ ] अधिसभा सदस्य श्री. कांबळे एन. आर. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

विद्यापीठात कार्यालयीन कामासाठी येणाऱ्या शिक्षक-शिक्षकेतर सेवकांना विद्यापीठाकडून रिक्षा चार्ज २०० रुपये दिला जातो. मात्र पेपरचे गठ्ठे घेवून कॅप सेंटरवर पोहोच करण्यासाठी जाणाऱ्या किंवा विद्यापीठात येणाऱ्या सेवकांना विद्यापीठ परीक्षा मंडळाकडून रिक्षा चार्ज फक्त ८० रुपये दिला जातो. त्यामध्ये वाढ करुन तो ८० रुपये ऐवजी २०० रुपये देणेत यावा. म्हणून ही अधिसभा परीक्षा मंडळाकडे शिफारस करीत आहे.

ठराव: सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

[ ८ ] अधिसभा सदस्य डॉ. चव्हाण सी. एस. यांनी खालील प्रस्ताव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

सोलापूर विद्यापीठाच्या ग्रंथालयातील संदर्भग्रंथांची उपलब्धता अत्यल्प आहे. तरी सामाजिकशास्त्रे विद्याशाखेतील सर्व विषयांचे संदर्भग्रंथ व नियतकालिके वाढवावीत अशी शिफारस ही अधिसभा ग्रंथालय समितीस करीत आहे.

ठराव: सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास प्राचार्य डॉ. देशमुख ए. एल. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. चव्हाण सी. एस. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.

[ ९ ] अधिसभा सदस्य डॉ. चव्हाण सी. एस. यांनी खालील प्रस्ताव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

सोलापूर विद्यापीठात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र विद्यापीठामार्फत सुरु करुन सर्व विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होईल अशी सोय करावी अशी शिफारस ही अधिसभा विद्यापरिषदेस करीत आहे.

ठराव: सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. बचुटे एम. टी. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

[ १० ] अधिसभा सदस्य डॉ. चव्हाण सी. एस. यांनी खालील प्रस्ताव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

सोलापूर जिल्हयात भक्ती चळवळीचा मोठा वारसा आहे तरी संतानी सामाजिक व आध्यात्मिक क्षेत्रात केलेल्या योगदानाचा अभ्यास करण्याकरिता संत साहित्य अध्यासन केंद्र सुरु करावे अशी शिफारस ही अधिसभा विद्या परिषदेस करीत आहे.

ठराव: सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास श्री. शिंदे आर. बी. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. चव्हाण सी. एस. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.

[ ११ ] अधिसभा सदस्य डॉ. रोंगे बी. पी. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

“कायम विनाअनुदानित व्यवसायिक महाविद्यालयातील शिक्षकांना विद्यापीठ स्टॅटयूट मधील तरतुदीनुसार महाविद्यालयांच्या प्रस्तावांस अनुसरुन, सहा महिने किंवा एका शैक्षणिक वर्षाकरिता मान्यता देण्यात यावी अशी शिफारस ही अधिसभा विद्यापीठ प्रशासनास करित आहे.”

ठराव: सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. बारबोले ए. एन. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

[ १२ ] अधिसभा सदस्य श्री. गायकवाड आर. एस. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"विद्यापीठाच्या नविन परीक्षा पध्दतीनुसार ७० टक्के गुणाची परिक्षा विद्यापीठ स्तरावरती होते व ३० टक्के गुणाची परिक्षा संबंधीत महा विद्यालय घेते. सबब परीक्षा शुल्कापैकी ३० टक्के रक्कम संबंधीत महा विद्यालयाला देण्यास मंजूरी घ्यावी अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करत आहे "

ठराव: सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास प्राचार्य डॉ. कोळेकर सी. बी. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

[ १३ ] अधिसभा सदस्य प्राचार्य डॉ. देशमुख ए. एल. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"सेमिस्टर परीक्षा पध्दतीत परीक्षा फॉर्म भरण्याची तारीख व परीक्षा सुरु होण्याची तारीख या मधील कालावधी कमी झाल्याने अति विलंब शुल्का नंतर प्रति दिन रु.१००/- / रु.५००/- आकारण्यात येणारे शुल्क रद्द करुन त्या ऐवजी सरसकट रु.५०/- प्रति दिन करण्यात यावे अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

ठराव: सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास प्राचार्य श्री. राजमाने एन. आर. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

[ १४ ] **अधिसभा सदस्य प्राचार्य डॉ. देशमुख ए. एल. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

"पात्रता फॉर्म व परीक्षा फॉर्म संबंधीची संपूर्ण ऑनलाईन प्रक्रिया संबंधीत महाविद्यालय करीत असल्याने या साठी आकारण्यात आलेल्या फॉर्म शुल्काची संपूर्ण रक्कम संबंधीत महाविद्यालयांना देण्यास मंजूरी द्यावी अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

ठराव: **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास श्री. गायकवाड एस. पी. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| कुलसचिव | मा. कुलगुरु |
| सचिव, अधिसभा | अध्यक्ष, अधिसभा |

## विषय क्र. ०२ चे सहपत्र

## अधिसभेच्या रविवार, दि.२९ मार्च, २०१५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये प्रश्नोत्तराच्या तासामध्ये अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न, उपप्रश्न व त्यावर देण्यात आलेली उत्तरे

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| प्रा. डॉ. बारबोले ए. एन. | | ॲड. श्री. सलगर बी. एस. |
| १ | भारत रत्न इंदिरा गांधी महाविद्यालय सोलापूर, या इंजिनीअरिंग महाविद्यालयाचे विद्यापीठाने मान्यता दिलेले प्राचार्य हे प्राचार्य पदासाठी पात्र आहेत का? | होय. |
| | • संबंधित पात्र प्राचार्यांनी आपला सादर केलेला अनुभव विश्वेश्वरय्या टेक्निकल युनिव्हर्सिटीने अधिकृतपणे ते बोगस असल्याचे पत्र पाठविले आहे ते खरे आहे का? | त्यांना शोकॉज नोटीस पाठविली आहे. बोगस असल्याचे अजून डिक्लेअर केलेले नाही. |
| | • अशा पात्र समजल्या जाणाऱ्या प्राचार्यांवर विद्यापीठाची फसवणूक केली म्हणून गुन्हा दाखल केला जाणार आहे का? | त्यांनी चुकीचं पत्र दिलं असल्याचं अद्याप नक्की झालेलं नाही. ते झाल्यानंतर त्यावर निर्णय घेतला जाईल. |
| | • शोकॉज नोटीसमध्ये काय विचारणा केली आहे? | Therfore, you are hereby directed to produce the original of the said letter dt.०२/०९/२०१४ and original experience letter issued by PDA College of Engineering, Kalaburgi and appear before the undersigned in person on or before १६/०२/२०१५ and explain as to why the said letter dt.०२/०९/२०१४ should not be withdrawn and action should not be initiated against you for tampering the said letter dated ०२/०९/२०१४ issued by the University. |
| | • शोकॉज नोटीसमध्ये ज्या पत्राचा उल्लेख आहे ते पत्र जर त्या विद्यापीठाने काढून घेतलं तर हे मुस्तारे पात्र राहणार आहेत का? | ते पत्र जर काढून घेतलं तर त्यांच्यावरती आपण कार्यवाही करु. काढून घेतल्याशिवाय आम्हाला काहीच करता येणार नाही. आत्ताच्या परिस्थितीत त्या विद्यापीठाने जे एक्सपिरीअन्स सर्टिफिकेट दिलेले आहे, त्याप्रमाणे त्यांचा एक्सपिरीअन्स आहे. |
| २ | महाविद्यालयाने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा - १९९४ चा भंग केला अथवा विद्यापीठाचे आदेश पाळले नाहीत तर कोणती शिक्षा केली जाते? | विद्यापीठाशी संलग्नित एखादे महाविद्यालय तथा मान्यता प्राप्त परिसंस्था जर विद्यापीठाच्या आदेशांचे पालन करीत नसेल तर असे महाविद्यालय तथा मान्यता प्राप्त परिसंस्थांवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ व अनुषंगिक परिनियम व दंडकानुसार कार्यवाही केली जाते. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | | उदा:-<br>१. महाविद्यालय तथा मान्यता प्राप्त परिसंस्थेस आर्थिक दंड करणे.<br>२. महाविद्यालय तथा मान्यता प्राप्त परिसंस्थेतील विद्यार्थी प्रवेश प्रतिबंधित करणे.<br>३. महाविद्यालय तथा मान्यता प्राप्त परिसंस्थेचे संलग्निकरण काढून घेणे. |
| | • जर विद्यापीठाने या कायद्याचा व परिनियमांचा भंग केला तर कोणती शिक्षा केली जाते? | विद्यापीठाचे अधिकार मंडळाचे सदस्य / अधिकारी यांच्याकडून कायद्याचा परिनियमांचा भंग होऊन विद्यापीठाचे नुकसान झाल्यास संबंधीतांवर नियमानुसार जबाबदारी निश्चित करता येते. |
| | • विद्यापीठाने जर विद्यापीठ कायदा १९९४ पाळला नाही तर कोणास जबाबदार धरावे? | जो अधिकारी / कर्मचारी / अधिकार मंडळाचा सदस्य कायदा पाळत नाही तो जबाबदार राहील. |
| | • महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ नुसार अशा कोणत्या महाविद्यालयाचे संलग्निकरण काढून घेतले आहे का? | दलित मित्र कदम गुरुजी महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाचे संलग्निकरण काढून घेतले आहे. |
| ३ | महाराष्ट्र विद्यापीठ कायदा -१९९४ कलम १०६ -१ व २ नुसार विद्यापीठाच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यात हयगय करणाऱ्या प्राधिकरणातील सदस्य अथवा अधिकाऱ्यास कोणत्या शिक्षेची तरतूद आहे? | महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम १०६-१ व २ नुसार विद्यापीठाच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यात हयगय करणाऱ्या प्राधिकरणातील सदस्य अथवा अधिकाऱ्यास परिनियम क्र.३०१ ते ३२० मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्याचे प्रावधान आहे. |
| | • ही परिनियमातील कलमे रिकव्हरी ऑफ डॅमेज ऑर लॉस शी संबंधित आहेत का? तथापि प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व कर्मचारी नेमताना Scrutiny committee काहीची लाईफ डॅमेज केली आहेत म्हणजेच त्यांना तात्कालिन नोकरीतून त्यांना जावे लागले आहे त्यांचा यामध्ये काहीही दोष नसताना विद्यापीठाचे नुकसान व हितसंबंधास बाधा पोहचते अशा Scrutiny committee सदस्यांवर कारवाई होणार आहे का? | Scrutiny committee सदस्यांनी चुकीची Scrutiny केली आहे असे अद्याप निश्चित झालेले नाही. |
| | • अशा समिती सदस्यांवर कारवाई केली नसल्यास, करणार आहात का? | अद्याप Scrutiny committee ने चुकीचे काम केले आहे असे निश्चित नाही, त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | • आतापर्यंत या कलमानुसार प्राधिकरणातील सदस्य अथवा अधिकाऱ्यास शिक्षा झाली आहे का? | अद्यापपर्यंत कुणी चुकीचे काम केलेलं निश्चित झालेलं नाही त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. |
| **श्रीमती विभूते एस. बी.** | | **प्राचार्य श्री. पवार एस. के.** |
| ४ | पी. एच. डी च्या पात्र विद्यार्थ्यांना डी. आर. सी. समितीने डी. आर. सी. कार्यकक्षेच्या बाहेर जाऊन प्रवेश नाकारला आहे का? | नाही. |
| | • अधिसभा सदस्य डॉ. बारबोले यांनी मा. कुलगुरु यांच्याकडे पुराव्यासह तक्रार दिली होती त्याचे काय झाले? | त्या विद्यार्थ्यांना न्याय मिळालेला आहे. |
| | • आता जे मा. कुलगुरुंनी उत्तर दिले आहे त्या विद्यार्थ्याला अजूनही न्याय मिळाला नसल्याचे पुरावे दिल्यास त्या विद्यार्थ्याला न्याय मिळणार का? | प्रत्येक विद्यार्थ्याला न्याय मिळणे आवश्यक आहे त्यानुसार कारवाई करण्यात येईल. |
| ५ | विद्यार्थ्यांचे कोणत्या परीक्षांचे निकाल या वर्षीही वेळेवर लागले नाहीत? | ४८२ परीक्षेपैकी २८ परीक्षेचे निकाल ४५ दिवसापेक्षा जास्त कालावधीत जाहीर करण्यात आलेले आहे. बी. कॉम, एम. बी. ए., एम. कॉम, एम. सी. ए. इंजिनिअरींग, बी. एस्सी सेमिस्टर -३, बी. एस्सी (ई. सी. एस.), बी. एस्सी (बायोटेक) सेमिस्टर -४. |
| | • ४८२ परीक्षेपैकी २८ परीक्षेचे निकाल ४५ दिवसापेक्षा जास्त कालावधीत लागले आहेत याची विलंबाची कारणे काय आहेत? | यातील बऱ्याच विषयांना Approved Teachers उपलब्ध नसल्याने निकालास विलंब लागलेला आहे. |
| | • विद्यापीठाच्या परीक्षांचे निकाल ३० दिवसात लागणे अपेक्षित आहे की ४५ दिवसात? | परीक्षांचे निकाल ३० दिवसात लावावे मात्र निकालासाठी ४५ दिवसापेक्षा जास्त दिवस लागू नयेत, अशी तरतूद आहे. |
| ६ | अनेक महाविद्यालयात युनिट टेस्ट व होम असाईन्मेट न घेता मार्क दिल्याचे कळते. रेकॉर्ड तपासण्याची यंत्रणा विद्यापीठाने तयार केली आहे का? | कोणत्याही महाविद्यालयाकडून युनिट टेस्ट व होम असाईन्मेट न घेता मार्क दिल्याची बाब विद्यापीठाच्या निदर्शनास आलेली नाही. अंतर्गत गुण ही महाविद्यालयीन स्तरावरील बाब आहे. सदर गुण जमा करुन घेताना परीक्षा विभाग सर्व रेकॉर्ड तपासून गुण जमा करुन घेतात. |
| | • समजा एखादी तक्रार आली आणि विद्यापीठाकडे मागणी केली तर तशी व्यवस्था आहे का? | विद्यापीठाच्या दि.३० ऑगस्ट, २०१४ च्या परिपत्रकानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | • विद्यार्थ्याला दिले जाणारे गुण हे विद्यापीठाच्या एकूण गुणामध्ये मिसळले जातात महाविद्यालयातील रेकॉर्ड तपासण्याची जबाबदारी विद्यापीठाची नाही काय? | आहे. |
| | • परीक्षा विभागाकडून सर्व रेकॉर्ड तपासले जाते आहे असे म्हटले आहे त्यात काय काय तपासले जाते? | गुणपत्रकावर संबंधित शिक्षकाची सही व ते गुणपत्रक प्राचार्यामार्फत पाठविले आहे का हे तपासले जाते. |
| **डॉ. आवताडे एच. के.** | | **प्रा. डॉ. सुर्यवंशी एस. एस.** |
| ७ | महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ३२(५) (घ) नुसार परीक्षा मंडळाच्या किंवा समितीच्या सदस्यास प्राश्निक, परीक्षक, नियामक किंवा निर्देशी म्हणून नियुक्त करता येत नाही. कायद्याचे हे कलम शिथील करुन उपरोक्त सदस्यांना काम देण्याचा अधिकार मा. कुलगुरुंना आहे का? | नाही. |
| | • अपवादात्मक परिस्थितीत अशा एखाद्या व्यक्तीला काम दिलेलं आहे का? | मा. कुलगुरुंच्या मान्यतेने दिलेले आहे. |
| | • मा. कुलगुरुंनी यापूर्वी ३२(५) खाली परीक्षेचे काम करण्याचे आदेश दिले आहेत का? | होय, नावांची यादी आहे. |
| | • ३२(५) मधील सदस्यांने परीक्षेचे काम केले तर कायद्याचा भंग होतो का? | तांत्रिक दृष्या त्यास भंग म्हणता येईल मात्र JBVC मध्ये झालेल्या निर्णयानुसार मा. कुलगुरुंनी मान्यता दिली असेल तर त्यास कायद्याचा भंग म्हणता येणार नाही. |
| ८ | परिक्षेतील कामकाजाबाबत प्रमाद समितीने शिक्षा केलेल्या कोणत्या प्राध्यापकांची शिक्षा माफ करुन परीक्षेचे कामकाज दिले गेले? | कोणत्याही प्राध्यापकाची शिक्षा माफ करुन कामकाज दिले गेले नाही. |
| | • प्रमाद समितीने केलेल्या शिक्षेचा कालावधी संपल्यानंतर त्याला काम देता येते का? | देता येत नाही. |
| ९ | API पडताळणीसाठी नियुक्त समिती सदस्यांना किती मानधन देण्याची तरतूद केली आहे अथवा मा. कुलगुरुंनी असे किती मानधन निर्धारित केले आहे? | API पडताळणी समितीसाठी मा. कुलगुरु महोदयांनी खालीलप्रमाणे मानधन निर्धारित केले आहे.<br>१. अध्यक्ष - रु.७५०/-<br>२. सदस्य - रु.५००/- |
| | • हे मानधन एका केससाठी आहे का एका दिवसासाठी? | हे मानधन एका केससाठी आहे. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | • विद्यापीठामध्ये कोणत्याही जबाबदारीने कितीही वेळा किंवा अनेक वेळा काम करणाऱ्या समिती अध्यक्षाला किंवा सदस्याला सारखाच म्हणजे रु.१५०/- इतका प्रवास खर्च दिला जातो मग ए. पी. आय. पडताळणी समिती सदस्यांना इतक मानधन का दिलं जातं? | उमेदवारांच्या ए. पी. आय. पडताळणीसाठी त्याचा संपूर्ण अभ्यास करावा लागतो त्यामुळे त्यांना मानधन ठरविण्यात आलेलं आहे. |
| | • महाविद्यालय स्तरावर उमेदवारांच्या ए. पी. आय. व कागदपत्रांची पडताळणीसाठीही छाननी समिति नेमली जाते या समितीतील सदस्यांनाही निर्धारीत केलेले मानधन द्यावे असा नियम विद्यापीठ स्तरावर केला आहे काय? | नाही. |
| | • एल. आय. सी. समितीचे सदस्यही महाविद्यालयाचे सर्व रेकॉर्ड तपासतात मात्र त्यांना मानधन दिले जात नाही महाविद्यालयाकडूनही नियमाप्रमाणे रक्कम विद्यापीठाला मिळते मग ए. पी. आय. पडताळणी समितीला मानधन कोणत्या नियमांच्या आधारे दिले जाते? | मा. कुलगुरुंच्या मान्यतेनुसार देण्यात येत आहे. |
| | • आपण म्हणताय त्या केसमध्ये प्राध्यापकच प्राध्यापकाचा ए. पी. आय. तपासतात म्हणजे विद्यापीठाच काम प्राध्यापकच करतात तरी सुध्दा पैसे घेऊनही ए. पी. आय. तपासताना चुका झाल्या व भविष्यकाळात संबंधित प्राध्यापकाला काही अडचणी निर्माण झाल्या तर ती जबाबदारी कोणाची? | ए. पी. आय. तपासणी करण्याच्या समितीत तज्ञ असल्याने आणि त्यांच्या शिफारशीची पूर्ण शाहनिशा करुनच महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ त्यावर योग्य ती कारवाई करते, त्यामुळे त्यात चुका होण्याचा प्रश्न उद्भवत नाही. |
| | • अध्यक्ष व सदस्य यांची कामे सारखीच असल्याने त्यांच्या मानधनात विषमता का? | अध्यक्ष हा अध्यक्ष असतो व सदस्य हा सदस्य असतो. |
| | • हे जे मानधन ठरविण्यात आलेले आहे ते कोणत्या प्राधिकरणात ठरविले आहे? | मा. कुलगुरुंच्या मान्यतेने ठरविले आहे. |
| | • आतापर्यंत किती प्राध्यापकांची ए. पी. आय. पडताळणी समिती सदस्यांनी केली आहे? | ३२ जणांची पडताळणी केली आहे व १९ जणांना प्राध्यापक पद मान्यता दिलेली आहे. |
| | • ए. पी. आय. स्कोर कॅलक्युलेट करण्याचा विद्यापीठाला कोणत्या कायद्यानुसार अधिकार आहे? असा उल्लेख कुठे आहे का? | विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ३० जून, २०१० च्या अधिसुचनेतील परिच्छेद क्र.६.३.५ मध्ये तरतूद आहे. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| **डॉ. चव्हाण सी. एस.** | | **डॉ. घुटे व्ही. बी.** |
| १० | अल्पसंख्यांक महाविद्यालयातील सहायक प्राध्यापकांच्या भरतीकरिता असणारी निवड समिती व सहायक प्राध्यापकांचे सहयोगी प्राध्यापक म्हणून पी. बी. एस. कॅस नुसार पदोन्नती होतानाची समिती कशी गठीत केली जाते? | विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ३० जून, २०१० च्या अधिसुचनेतील परिच्छेद क्र.५.१.५ नुसार निवड समिती गठीत केली जाते. |
| उपप्रश्न | सहयोगी प्राध्यापक होण्याकरिता अल्पसंख्यांक महाविद्यालयातील सहायक प्राध्यापकांसाठीची समितीची रचना कशी आहे? | सदर निवड समितीसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ३० जून, २०१० च्या अधिसुचनेतील परिच्छेद क्र.५.१.५ प्रमाणे रचना आहे. |
| | • अल्पसंख्यांक महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या नियुक्ती संबंधी किंवा सहयोगी / सहायक प्राध्यापक म्हणून नियुक्ती करण्यासाठीच्या समितीची रचना कशी असावी याबाबत कोर्टाचे काही पत्र आपल्याकडे आलेले आहेत का? | अल्पसंख्यांक संस्थेचे असे म्हणणे आहे की त्यांना विद्यापीठ अनुदान आयोग व महाराष्ट्र शासन यांचे नियम लागू होत नाहीत, याबाबत अल्पसंख्यांक आयोगाकडे केस चालू आहे. |
| | • अल्पसंख्यांक महाविद्यालयातील सहायक प्राध्यापकांच्या भरतीकरिता युजीसीच्या नियमानुसार असणारी निवड समिती बंधनकारक आहे का? | आहे. |
| | • हा नियम आपल्या विद्यापीठाचा आहे की हा कायदा आहे? | महाराष्ट्र शासनाचा निर्णय आहे. |
| | • नियमित महाविद्यालयातील भरतीप्रक्रिया व अल्पसंख्यांक महाविद्यालयातील भरतीप्रक्रिया यामध्ये काय फरक आहे? | युजीसी आणि महाराष्ट्र शासनाने यात कुठलाही फरक केलेला नाही. |
| | • अल्पसंख्यांक संस्थेला रोस्टर लागू आहे की नाही? | नाही. |
| | • जर रोस्टर लागू नाही तर अल्पसंख्यांक संस्थेच्या भरतीमध्ये व इतर महाविद्यालयाच्या भरतीमध्ये काय फरक आहे? | युजीसीच्या नियमाप्रमाणे काही अल्पसंख्यांक महाविद्यालयांना अधिकार दिले आहेत त्यानुसार त्यांच्या निवड समितीकरीता प्रतिनिधी पाठविला जातो. |
| ११ | सोलापूर विद्यापीठात कार्यरत रीडर पदावरील अध्यापकांची सहयोगी प्राध्यापक म्हणून पदोन्नती करण्याकरिता कोणती कार्यवाही करण्यात आली आहे? | सोलापूर विद्यापीठात कार्यरत असलेल्या रीडर (प्रपाठक) पदावरील अध्यापकांची सहयोगी प्राध्यापक म्हणून पदोन्नती करण्याकरिता विद्यापीठात विहित समिती नेमलेली असून समितीच्या शिफारशीनुसार कार्यवाही सुरु आहे. |
| | • ही कार्यवाही साधारणपणे कधीपर्यंत पूर्ण होईल? | लवकरच पूर्ण होईल. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १२ | विविध महाविद्यालयाकडून पात्रता अर्ज विद्यापीठात जमा करण्यास विलंब झाल्यास त्यावेळी किती दंड आकारण्यात येतो? | विविध महाविद्यालयाकडून पात्रता अर्ज विद्यापीठात जमा करण्यास विलंब झाल्यास त्यावेळी प्रस्तुत विद्यापीठाने प्रसिध्द केलेल्या परिपत्रक क्रमांक-३ मधील Appendix -I मध्ये नमूद केल्याप्रमाणे विलंब शुल्क आकारले जाते. त्याचप्रमाणे दिनांक २९ नोव्हेंबर, २०१४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेमधील ठराव क्रमांक १३ नुसार अतिरिक्त विलंब शुल्कानंतर प्रति दिन, प्रति विद्यार्थी रु.५०/- प्रमाणे दंड आकारण्यात येतो. |
| | • प्रति दिन, प्रति विद्यार्थी रु.५०/- प्रमाणे दंड आकारण्याऐवजी एक विशिष्ट दंड आकारण्यात का येत नाही? | विद्यापीठाच्या परिनियमामध्ये केलेले नियम पाळले जातात. |
| | • इतर विद्यापीठातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ३० मार्च पूर्वी मायग्रेशन सर्टिफिकेट जमा करणे बंधनकारक आहे. वेळेत हे सर्टिफिकेट जमा न केल्यास रु.५००/- दंड भरावा लागणार आहे. मायग्रेशन सर्टिफिकेट संदर्भात शिवाजी विद्यापीठाकडे वारंवार पाठपुरावा करुन देखील त्यांच्याकडून मायग्रेशन सर्टिफिकेट बाबत कारवाई होत नाही अशा वेळी संबंधित विद्यार्थ्याची कोणतीही चूक नसताना त्यास रु.५००/- दंड आकारणार का? | स्पेसिफिक केस टू केस निर्णय घेण्यात येतो. |
| **डॉ. रोंगे बी. पी.** | | **डॉ. शिळीमकर टी. एन.** |
| १३ | विद्यापीठाने तासिका तत्वावर मान्यता दिलेल्या शिक्षकांचा असा अनुभव त्यांना नोकरीसाठी गरज असेल तर किंवा नियमित मान्यता मिळाल्यानंतर पी. जी. टीचर रेकगनिशन साठी विचारात घेण्यात येतो का? | नाही. |
| १४ | विद्यापीठ स्टटयूटमधील तरतुदीनुसार विद्यापीठ महाविद्यालयांनी सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन शिक्षकांना सहा महिने किंवा एका शैक्षणिक वर्षाकरिता मान्यता का देत नाही? | मान्यता देण्यात येते. |
| | • गेल्या वर्षभरामध्ये मान्यता दिलेल्या महाविद्यालयाचे व महाविद्यालयाच्या शिक्षकाचे नाव सांगता येईल का? | तासिका तत्वावर अनेक महाविद्यालयातील पुष्कळ शिक्षकांना मान्यता दिलेली असून सदर माहिती कार्यालयात आहे. तथापि, नियमित पुर्णवेळ मान्यता देणे झालेले नाही. |

सही/-
सचिव अधिसभा
(कुलसचिव)